

# पद्मकली

## एक तरल प्रेमकथा

संदीप द. बोडके

स्वामीसेवा प्रकाशन



# पद्मकली

एक तरल प्रेमकथा

संदीप द. बोडके

स्वामीसेवा प्रकाशन

# पद्मकली Padmakali

-श्री. संदीप द. बोडके
भ्रमणध्वनी क्र. ९९२०३३३८४३
e-mail : sdb.bharat@gmail.com

**प्रकाशक**
**स्वामीसेवा प्रकाशन**
एन एल १ बी ५६/४, सेक्टर १०,
नेरूळ, नवी मुंबई, ४०० ७०६.
भ्रमणध्वनी : ८२६८८२२७०२
swamisevaprakashan@gmail.com

**वितरक**
**ई-साहित्य प्रतिष्ठान**

**© लेखकाधीन**

**अक्षरजुळणी**
**बीएम आर्ट, कामोठे**

**ई-बुक आवृत्ती**

ई वितरक :
ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www.esahity.com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 या नंबर ला Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app. https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. download करा.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत.

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे...

टीम ई साहित्य

## सूचना

सदर दीर्घकथा संपूर्णतः काल्पनिक असून, त्यातील पात्र, प्रसंग आणि त्यांची नावे काल्पनिक आहेत. त्यांचा कोणत्याही पौराणिक, ऐतिहासिक पात्राशी संबंध नाही.

या दीर्घ्कथेचे सर्व हक्क सुरक्षित असून, यातील मजकुराचे पुनर्मुद्रण अगर कथानकाचे किंवा कोणत्याही भागाचे दृकश्राव्य, नाटक, सिनेमा, एकांकिका आदी तत्सम प्रकारांत रूपांतर करायचे असल्यास लेखकाची लिखित परवानगी आवश्यक आहे. तशी परवानगी न घेतल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल. याची नोंद घ्यावी.

पद्मकलीप्रमाणे जीवन
जगणाऱ्या, तिच्याच वाटेने
आपल्या प्रेमाचा आणि
जीवनाचा शेवट करणाऱ्या
तमाम आधुनिक 'पद्मकलीं'ना हे
साहित्यपुष्प...

समर्पित!

# ‘पद्मकली’ची जन्मकथा

‘पद्मकली’ ही दीर्घकथा वाचकांच्या हाती देताना अत्यंत आनंद होत आहे. जवळ जवळ दोन वर्षांपूर्वी ही कथा लिहून पूर्ण झाली. माझ्या ‘कथाकुंभ’ या ब्लॉगवरही ती प्रकाशित केली, परंतु जास्तीत जास्त वाचकांपर्यंत ती पोहोचावी अशी माझी इच्छा होती. ‘ई-बुक’च्या माध्यमातून आज ती पूर्ण होत आहे.

‘पद्मकली’चे कथाबीज बऱ्याच वर्षांपासून मनात होते. त्याला कारणही तसेच होते. वत्सायन लिखित ‘कामसूत्र’ हा ग्रंथ २००४-०५च्या दरम्यान माझ्या वाचनात आला. स्त्री-पुरुष शारीरिक संबंधांवर इतका समग्र ग्रंथ यापूर्वी माझ्या वाचनात आला नव्हता. विशेष म्हणजे हा ग्रंथ कोणत्याही आर्वाचीन अभ्यासक किंवा डॉक्टरने लिहिलेला नसून, एका प्राचीन ऋषीने लिहिला आहे. अगदी बारीकसारीक गोष्टींचा विचार या ग्रंथात केला गेला आहे. हा ग्रंथ वाचून झाल्यावर एक विचार डोक्यात सतत होता, तो म्हणजे इतका समग्र ग्रंथ जर प्राचीन भारतात लिहिला गेला आहे, तर या विषयाच्या प्रशिक्षणाची सोयही त्या वेळी नक्कीच असणार! मग ती कशाप्रकारे असेल? पूर्वी भारतात गुरुकुल पद्धतीने शिक्षण दिले जात होते. किमान १२ वर्षे गुरुगृही राहून शिक्षण घेतले जात होते. यातच काही काल्पनिकता आणून ‘पद्मकली’ची रचना केली.

गुरुगृही राहून जरी शिक्षण घेतले जात असले तरी सरसकट सर्वच आश्रमात या विषयावर शिक्षण दिले जात नसावे. त्यासाठी वेगळे आश्रम नक्कीच असतील, परंतु कामसूत्र हा विषय शिकण्यासाठी ठराविक वर्गातील तरुणच येत असावेत. त्यात प्रामुख्याने राजकुमार, धनिकांची, व्यापाऱ्यांची मुले यांचा समावेश असावा. एकापेक्षा अधिक स्त्रियांशी संबंध शक्यतो याच वर्गातील पुरुषांचे येत असत. त्यामुळे त्यांनाच या विषयाचा जास्त उपयोग किंबहुना गरज होती. कामसूत्राचे शास्त्रोक्त शिक्षण घेतल्यानंतर त्याच्या प्रत्यक्ष अभ्यासाला व कामक्रीडा अनुभवण्यासाठी स्त्रियांची आवश्यकता भासणारच, पण कुलीन घरातील स्त्रिया तर असे कार्य नक्कीच करणार नाहीत, म्हणजे हे कार्य गणिकांकडूनच होऊ शकते. यासाठी मग गणिकांचे प्रशिक्षण आणि त्यांचेही आश्रम असणारच. हा धागा पकडून त्याभोवती कथासूत्र गुंफले आहे.

यानिमित्त आणखी एक विषय इथे मांडावासा वाटतो, तो म्हणजे ज्या भारताने जगाला ‘कामसूत्रा’ची देणगी दिली, जेथे खजुराहोसारखी कामशिल्पे कोरली आहेत, कामदेव-रतीसारख्या कामदेवता आहेत त्याच भारतात आज लैंगिक शिक्षणाच्या नावाने चाललेला वाद पहिला की हसायला येते. लैंगिक शिक्षणाचे समर्थक

व विरोधक या दोघांनाही मला सांगावेसे वाटते की, या विषयावर व्यर्थ वाद घालण्यापेक्षा हे शिक्षण योग्य पद्धतीने कसे देता येईल यावर त्यांनी अभ्यास करावा. मला वाटते की या विषयाचे शिक्षण द्यायचे झाल्यास आधी प्रचलित शिक्षण पद्धतीत काही बदल आवश्यक आहेत. त्यासाठी मुलांच्या आणि मुलींच्या शाळा वेगळ्या कराव्या. कारण ते एकत्र असल्यास कोणताही नवीन विषय शिकल्यावर ते प्रत्यक्ष अनुभवण्याची उपजत इच्छा मुलामुलींना स्वस्थ बसू देणार नाही. त्यातून लैंगिक अराजकता निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा केवळ मी प्राथमिक निष्कर्ष मांडला आहे. यावर खोलवर विचार होणे गरजेचे आहे. असो...

'पद्मकली' आपल्या सर्वांना नक्कीच आवडेल असा विश्वास वाटतो. पद्मकली व यातील पात्र कुणाचेही प्रतिनिधित्व करीत नाहीत. या कथेत कुणाचीही बाजू किंवा दुःख मांडण्याचा माझा प्रयत्न नाही. केवळ एक कल्पना आणि त्याभोवती गुंफलेली एक तरल प्रेमकथा एवढेच या दीर्घकथेचे प्रयोजन आहे. वाचकांनी कुठलाही पूर्वग्रह न ठेवता व कोणत्याही प्राचीन किंवा ऐतिहासिक घटनांशी याचा संदर्भ न जोडता या कथेचा आस्वाद घ्यावा असे वाटते. 'पद्मकली'च्या प्रवासातील सर्व ज्ञात-अज्ञात सहाय्यकांचे, तसेच 'पद्मकली'ला वाचकांपर्यंत पोहोचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या 'ई-साहित्य प्रतिष्ठान'चे मनःपूर्वक आभार मानतो आणि थांबतो. धन्यवाद...!

**-श्री. संदीप दशरथ बोडके**
भ्रमणध्वनी क्र. ९९२०३३३८४३
e-mail : sdb.bharat@gmail.com





# पद्मकली

## ||१||

आश्रमावर सूर्यास्तानंतरचे मळभ दाटून आले होते. आश्रमाच्या आवारात मशाली ढणढणू लागल्या होत्या, तर निरनिराळ्या कुटींमधून दिव्यांचा, समयांचा मिणमिणता उजेड बाहेर डोकावू लागला होता. आश्रमातील सर्व कुटींमधील गडबड शांत होत होती. केवळ गुरुराणी मणिकुंतला आणि अन्य पाच कुटींमध्ये वेगळीच हालचाल जाणवत होती. गुरुराणी आज सायंकाळी आश्रमात आलेल्या पाच अतिथींना आपल्या कुटीमध्ये काही तरी सांगत होत्या. गुरुराणी मणिकुंतलेची कुटी अत्यंत प्रशस्त होती. कुटी दोन भागांत विभागलेली होती. आतील भागात एका बाजूला प्रशस्त शिसवी पलंग होता; ज्यावर मणिकुंतला झोपत असे. एका कोपऱ्यात कामदेव आणि रतीची मूर्ती मोठ्या चौरंगावर ठेवलेली होती. त्यापुढे वत्सायन लिखित कामसूत्र ग्रंथाची प्रत गुलाबी मखमली कापडात गुंडाळून त्यावर दोन गुलाबपुष्पे ठेवली होती, तर बाहेरील भाग मुख्य बैठकीचा होता. तिथे अर्ध्या भागात भिंतीला लागून गाद्या अंथरलेल्या असत. एका भिंतीला लागून मधोमध गुरुराणीचे आसन होते समोर गाद्यांवर इतर लोक बसत असत. भोजनासाठी तिथेच समोर चौरंग मांडले जात. त्या पाचही जणांचे भोजन गुरुराणी मणिकुंतलेच्या कुटीमध्येच पाठविण्यात आले होते. इतर पाच कुटींमध्येही भोजनाची ताटे पाठविली गेली. या कुटींमधील वातावरण मात्र वेगळेच होते. त्या प्रत्येक कुटीमध्ये एक एक षोड्शवर्षीय ललना साजश्रृंगार करीत होती. त्यातीलच एका कुटीत पद्मकलीही साजश्रृंगार करीत होती. भावनेचे नाना तरंग तिच्या मनात उठले होते. नकळत तिचे मन वर्षभरापूर्वीच्या घटना आठवू लागले.

एक वर्षापूर्वी पद्मकली आपल्या माता-पित्यासोबत राहत होती. मातेने तिचे नाव शिवांगी ठेवले होते. शिवांगीची दिनचर्या इतर मुलींप्रमाणे सुरू होती, मात्र ती पंधरा वर्षाची झाली आणि एके दिवशी तिच्या घरी काही अगंतुक स्त्री अतिथी आल्या. त्या चार तिशी-पस्तीशीतल्या स्त्री अतिथी शिवांगीच्या माता-पित्याशी काही तरी बोलल्या आणि थोड्या वेळानंतर शिवांगीला बोलावले. शिवांगी आल्यानंतर त्या स्त्रियांनी तिला बारकाईने सर्व बाजूंनी पाहिले. त्यातील दोघी तिला वेगळ्या कक्षात घेऊन गेल्या. तेथे त्यांनी तिला सर्व वस्त्रालंकार उतरविण्यास सांगितले. शिवांगीने घाबरतच तसे केले. मग पुन्हा त्या दोघींनी तिला पूर्णपणे न्याहाळून, शिवांगीला वस्त्रालंकार पुन्हा घालण्यास सांगून बाहेर निघून गेल्या. शिवांगी तेथेच पलंगावर बसली. तिला बाहेर जाण्याचीही भीती वाटू लागली होती. इतक्यात, तिची माता आत आली.

''शिवांगी, चल बाळ बाहेर चल!''

''आई, हे काय चालले आहे?'' शिवांगीने जरा रागातच विचारले.

''काही नाही, तुला काही वर्षांसाठी त्यांच्याबरोबर आश्रमात राहण्यास जायचे आहे.''

''काऽऽय? कशासाठी?'' आता मात्र शिवांगी गोंधळली.

''पुढील शिक्षणासाठी...''

''पण माझ्या कोणत्याही सख्या अशा कोणत्याही शिक्षणासाठी कुठेही जात नसताना मीच का जायचे?''

''तुझ्या पुढील जीवनासाठी हे शिक्षण आवश्यक आहे. आता आणखी प्रश्न विचारू नकोस. चल, निघण्याची तयारी कर. सूर्यास्तापूर्वी तुम्हाला निघायचे आहे.''

शिवांगीने नाना प्रश्न मनात ठेवूनच आश्रमात पाऊल ठेवले. आश्रम तिच्या राज्यापासून अत्यंत दूर घनदाट अरण्यात होता. केवळ आश्रमातील लोक आणि अरण्यातील श्वापदे यांच्याव्यतिरिक्त अन्य कुणाचाही तिथे वावर नव्हता. पंधरा-वीस दिवसांच्या प्रवासानंतर शिवांगी तिथे पोहोचली. तिच्या येण्यापूर्वी आणखी चार मुली तिथे आल्या होत्या. त्या पाचही जणींची निवासाची व्यवस्था एकाच कुटीत करण्यात आली होती. एक दिवसाच्या विश्रांतीनंतर गुरुराणी मणिकुंतलेच्या कुटीत त्यांना नेण्यात आले. गुरुराणीने त्यांना सर्व काही समजावून सांगितले. पुढील एक तप म्हणजे बारा वर्षे आपणाला येथे राहायचे आहे हे शिवांगीला या वेळी कळले. त्याच दिवशी सायंकाळी पाचही

जणींचा रीतसर आश्रमप्रवेशाचा विधी झाला, प्रत्येकीचे नाव बदलण्यात आले. शिवांगीचे नाव पद्मकली ठेवण्यात आले. गुरुराणीच्या कुटीमधील कामदेव आणि रतीचे, तसेच कामसूत्र ग्रंथाचे पूजन त्यांच्याकडून करून घेण्यात आले. दुसऱ्या दिवशी पहाटेपासून त्यांच्या शिक्षणाला सुरुवार होणार होती. रात्री भोजनानंतर सर्व निजानीज झाली. शिवांगी म्हणजेच पद्मकली मात्र जागीच होती. ती मनातून खूप अस्वस्थ होती. इतक्यात, तिला बाजूला हालचाल जाणवली. तिने त्या दिशेला पाहिले. तिच्या बाजूला झोपलेली मधुलिका कूस बदलत होती.

''झोपली नाहीस का अजून?'' पद्मकलीने तिच्याकडे तोंड फिरवत विचारले.

''छान डोळा लागला होता. आताच जाग आली.'' मधुलिका स्मित करीत म्हणाली.

''तुला इथून पळून जावं असं वाटत नाही का?''

''हूंऽऽ''

''मग तू प्रयत्न का करीत नाहीस?''

''केला होता!''

''काऽऽऽय?'' पद्मकली आश्चर्याने उठून बसली, ''मग काय झालं? पुन्हा तू इथे कशी?''

''अगं, हे अरण्य इतकं घनदाट आहे की कित्येक कोसांपर्यंत इथे मनुष्यवस्ती नाही.'' उठून बसत मधुलिका सांगू लागली, ''एकदा जंगलात शिरले की दिशासुद्धा समजत नाही. मी आश्रमातून बाहेर पडून पूर्ण दिवसभर भटकले. बाहेर जायच्या वाटा शोधत होते, पण का कसे दिवसभरात तीन वेळा मी पुन्हा फिरून आश्रमाजवळच आले. इथून दूर काही अंतरावर आणखी एक आश्रम आहे, पण तिथे केवळ पुरुषच राहतात. शेवटी मी पळून जाण्याचा नाद सोडला आणि आश्रमात परत आले.'' निराश मनाने किती तरी वेळ दोघी एकमेकींकडे पाहात बसल्या.

पहाटे आश्रमातील सर्व स्त्रियांची सूर्योपासना झाली आणि सर्व जणी आपापल्या कामाला लागल्या. आश्रमातील इतर मुलींचे त्यांच्या त्यांच्या गटानुसार शिक्षण सुरू झाले. कुठे आसन, कुठे ध्यान सुरू होते. पद्मकलीसह तिच्या गटाला गुरुराणीकडे पाठविण्यात आले. गुरुराणीने काही सोपी आसने त्यांच्याकडून करून घेतली आणि मग एका मोठ्या वृक्षाच्या छायेत ते बसले.

पुन्हा एकदा गुरुराणीने त्यांना आश्रमातील नियम समजावून सांगितले. बोलता बोलता गुरुराणीसह सर्वांसाठी कसला तरी काढा देण्यात आला. थोडा कडवट असलेला काढा प्राशन करताना सगळ्या एकमेकींकडे पाहू लागल्या. इतक्यात गुरुराणी म्हणाली, ‘‘कडवट असला तरी हा काढा तुमच्या पुढील निरामय आयुष्यासाठी फार उपयोगी आहे.’’ मग सगळ्या जणींनी तोंड कसनुसे करीत काढा प्राशन केला. उन्हे चढल्यावर पद्मकलीच्या गटाला नेमून दिलेली कामे त्यांनी केली. दुपारी भोजनानंतर विश्रांती घेऊन सायंकाळी उन्हे कलल्यावर पुन्हा साऱ्या जणी आश्रमातील प्रांगणात जमल्या. सामूहिक प्रार्थना होऊन गटागटाने प्रशिक्षण सुरू झाले. या वेळी सर्व गट वेगवेगळ्या वृक्षाखाली बसून आपापल्या शिक्षिकेकडून ज्ञान ग्रहण करण्यात मग्न होते. पद्मकलीच्या गटालाही गुरुराणीने एका डेरेदार वृक्षाखाली बसून पुरुषांचे स्वभाव आणि लक्षणे सांगितली. पद्मकलीला कळेना हे आपल्याला का सांगितले जात आहे, पण तरीही ती सारे निमूटपणे श्रवण करीत होती आणि जितके मनात साठवता येईल तितके साठवत होती. काही दिवसांतच तिला यात गोडीही वाटू लागली.

पद्मकलीचे शिक्षण सुरू होऊन आता एक मास झाला होता. ती आश्रमात बऱ्यापैकी रुळली होती. एके दिवशी मात्र एक विलक्षण घटना घडली. एका सायंकाळी एक दहा-बारा व्यापाऱ्यांचा गट आश्रमात आला. त्यांचे सामान आणि प्राणी त्यांनी आश्रमाच्या आवारात ठेवले. रात्री ते आश्रमातच मुक्कमी थांबले, पण गंमत पुढेच होती. रात्री भोजन झाल्यानंतर प्रत्येक व्यापारी एकेका कुटीमध्ये गेला. काही काळानंतर एक छोटा कलश आणि भांडे घेऊन आश्रमातील काही स्त्रिया एकेक करून त्या व्यापाऱ्यांच्या कुटीमध्ये गेल्या आणि कुटीची दारे बंद झाली. पद्मकली आणि तिची सखी मधुलिका त्यांच्या कुटीच्या खिडकीतून हे सारे पाहत होत्या. दोघींनी एकमेकींकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले. काही वेळाने कंटाळून त्या आपापल्या अंथरुणावर येऊन पडल्या आणि थोड्याच वेळात निद्राधीन झाल्या.

सकाळी नेहमीप्रमाणे त्या उठल्या आणि कुटीच्या बाहेर आल्या. व्यापाऱ्यांची जाण्याची गडबड सुरू होती. तयारी पूर्ण झाल्यावर त्यांच्यातला एक व्यापारी गुरुराणीच्या कुटीकडे गेला. गुरुराणी कुटीच्या बाहेर आली. व्यापाऱ्याने काही तरी बोलत गुरुराणीला एक कमरेला खोचलेली थैली काढून दिली आणि प्रणाम केला. गुरुराणीनेही त्याला प्रणाम करत हासत निरोप दिला. व्यापाऱ्यांचा तांडा निघून गेला. आश्रमाची नित्यकर्मे सुरू झाली. पद्मकलीच्या गटाला शिकवायला

आज पर्णिका आली होती. तिच्याशी पद्मकलीचे चांगलेच सख्य होते. शिकवणी संपल्यानंतर थोडा अवधी असताना मधुलिकेला सोबत घेऊन पद्मकलीने पर्णिकेला रात्रीच्या प्रकाराबाबत विचारले. पर्णिकेने भोजनानंतर विश्रांतीच्या काळात सांगेन असे म्हटले. दोघीही त्या वेळेची अतुरतेने वाट पाहत होत्या. दुपारी भोजनानंतर लगबगीनेच त्या पर्णिकेकडे गेल्या. पर्णिका त्या दोघींना घेऊन एका वृक्षाखाली बसली आणि तिने त्यांना सर्व प्रकार सांगितला.

महिन्यातून एक-दोन वेळा असा व्यापाऱ्यांचा तांडा आपल्या आश्रमात येतो. कित्येक महिने व्यापारानिमित्त आपल्या कुटुंबापासून दूर राहिल्याने ते स्त्रीसुखापासून वंचित असतात. ते सुख आपण त्यांना आपल्या आश्रमात पुरवितो. त्या बदल्यात आपल्याला द्रव्यप्राप्ती होते. व्यापारीच नाही तर काही धनिक आणि राजेरजवाडेही काही वेळा आपल्या आश्रमात येतात. त्यांच्या कृपेवरच आपल्या आश्रमाची दिनश्चर्या सुरू असते. पद्मकली व तिच्या गटाला सध्या कामसूत्राचे शिक्षण दिले जात असून, शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनाही एक तप म्हणजेच बारा वर्षे पूर्ण होईपर्यंत हेच कार्य करायचे आहे. एक तप पूर्ण झाल्यानंतर त्या स्वतंत्र होणार होत्या. मग त्यांनी आश्रमात राहायचे की निघून जायचे हा निर्णय त्यांचा असणार होता. बऱ्याच स्त्रिया इथे येणाऱ्या व्यापाऱ्यापैकी किंवा इतर लोकांपैकी कुणाशी तरी सख्या करून, एक तप पूर्ण झाल्यानंतर त्या व्यक्तीच्या आश्रित म्हणून निघून जात असत. आश्रमातून बाहेर पडताना त्या स्त्रीने स्वतःच्या जबाबदारीवर बाहेर पडायचे. एकदा बाहेर पडल्यानंतर आश्रम तिची पुन्हा जबाबदारी घेत नसे आणि अशा स्त्रीला घरीही जाता येत नसे कारण घरचे कुणीही त्यांना स्वीकारत नसे. इथे येणाऱ्या बहुतेक स्त्रियांची घरच्यांनीच इथे रवानगी केलेली असे. पैशाच्या बदल्यात त्यांना इथे पाठविले जाई. पद्मकलीलाही तिच्या आई-वडिलांनीच पैशापोटी इथे पाठविले होते. दुसरे म्हणजे मृत्यूपर्यंत आश्रमात राहता येत नाही. वयाची साठ वर्षे पूर्ण होईपर्यंतच आश्रमात राहता येते. त्यापूर्वी मृत्यू झाला तर ठीक नाही तर साठ वर्षे पूर्ण झाल्यानंतर तिने सक्तीने आश्रम सोडून जायचे असते. कुठे जायचे ते तिने स्वतः ठरवायचे. त्यामुळे वृद्ध होईपर्यंत कुणीही स्त्री आश्रमात राहत नसे. केवळ गुरुराणीला यातून काही प्रमाणात सूट असे. ती मृत्यूपर्यंत किंवा वयाची सत्तर वर्षे पूर्ण होईपर्यंत आश्रमात राहू शकत असे, पण मृत्यूपूर्वी तिने तिचा उत्तराधिकारी नेमणे आवश्यक असे. प्रत्येक राज्यात असे एक-दोन आश्रम आहेत. इथून बाहेर पडणेही कठीण आहे. अरण्य इतके घनदाट आहे की वाट

मिळणे कठीण, तसेच एखाद्या व्यापारी तांड्याबरोबर पळून जायचे म्हटले तरी राज्याच्या सीमेवरील चौकीवर त्यांची तपासणी होई. सर्वांचे परवाने, साहित्य तपासले जाई. हे सर्व काटेकोर तपासले जाई. आश्रमातील एखादी स्त्री बाहेरील व्याक्तीबरोबर जाई तेव्हा आश्रमातून त्यांना एक अनुमती पत्र दिले जाई. त्यामुळे त्या स्त्रीला पुढे सोडले जात असे अन्यथा तिला पकडून कैद केले जात असे. पुढे कधी आश्रमातून विचारणा झाल्यानंतर तिची सुटका होई. पद्मकलीच्या सर्व शंकांचे पर्णिकेने समाधान केले, पण पद्मकलीला हे सर्व ऐकून धक्काच बसला होता. आपल्या मातापित्याला हे सर्व माहीत असेल का आणि नसेल तर त्यांची फसवणूक झाली म्हणायची, पण माहीत असेल तर... पद्मकली मनातून चरफडली... मग शांत होत मनाशीच म्हणाली, जाऊ दे आपल्या नशिबी हेच आहे म्हणायचे...!

पाहता पाहता एक वर्ष सरले आणि पद्मकलीचे शिक्षण पूर्ण झाले. आज त्या शिक्षणाची कसोटी लागणार होती. कुणी तरी पाच अगंतुक अतिथी आश्रमात आले होते आणि पद्मकली व तिच्या गटाला पाच वेगवेगळ्या कुटींमध्ये बसवून त्यांचा साजश्रृंगार करण्यात येत होता.

...आणि ती वेळ आली. रात्रीचा दुसरा प्रहर सुरू झाला. पद्मकलीबरोबर पर्णिकाही कुटीमध्ये बसली होती. थोड्याच वेळात एक विशीचा तरुण कुटीच्या दरवाजातून आत आला. तो आत येताच पर्णिका उभी राहिली आणि म्हणाली, ''या, राजकुमार धर्मादित्य!''

पाठोपाठ पद्मकलीही उभी राहिली. तिने उठताना चोरून त्याच्याकडे पाहिले. उंचापुरा, पिळदार शरीरयष्टीचा तो तरुण राजकुमार पाहताच तिच्या मनात ठसला. पर्णिका लगबगीने दरवाजाकडे गेली आणि तिने कुटीचे दार बंद केले. कुटीतील दिव्यांच्या वाती मागे सारल्या. कुटीतील प्रकाश मंद झाला. पद्मकली आणि राजकुमाराला तिने शय्या दाखविली व स्वतः कोपऱ्यातील एका आसनावर जाऊन बसली.

सकाळी उठताना पद्मकलीला कमरेत बारीकशी कळ जाणवली आणि रात्रीच्या आठवणीने तिचे शरीर पुन्हा मोहरले. राजकुमार धर्मादित्य केव्हाच उठून गेले होते. कुटीमध्ये कुणीच नव्हते. पर्णिकाही रात्रीच केव्हा तरी निघून गेली होती. पद्मकलीला थोडे लाजल्यासारखे झाले. बाहेर जाऊच नये असे तिला वाटत होते, पण कितीही वाटले तरी बाहेर जाणे भाग होते. तिने नित्यकर्मे आटोपली आणि ती नेहमीप्रमाणे गुरुराणीच्या कुटीकडे वळली. तिच्या सख्या

आधीच तेथे येऊन बसल्या होत्या. गुरुराणीने सर्वांना खुलेपणाने त्यांचे अनुभव विचारले आणि त्यावर सविस्तर चर्चा करून त्यांना काही सूचनाही केल्या. पुढील आठ-ते दहा दिवस ते अतिथी येथेच राहणार होते. रात्री नेहमीप्रमाणे राजकुमार पद्मकलीच्या कुटीत आला. असेच दोन-तीन दिवस गेले. आता पद्मकली आणि राजकुमारमध्ये थोडाफार संवाद होऊ लागला होता. राजकुमार स्वभावाने खूपच प्रेमळ होता. या आश्रमापासून दूर काही अंतरावर आणखी एक आश्रम होता. तेथे केवळ पुरुषांना कामसूत्राचे शिक्षण दिले जाई. अनेक राज्याचे राजकुमार आणि धनिकांची मुले तेथे कामसूत्राचे शिक्षण घेत असत. गेले वर्षभर राजकुमार आणि त्याचे सहकारी त्या आश्रमात शिक्षण घेत होते. पद्मकलीला मधुलिकेने हे मागेच सांगितले होते. हळूहळू पद्मकली आणि राजकुमार एकमेकांत गुंतत चालले. गुरुराणीलाही ते जाणवले. तिने पद्मकलीला समजावण्याचा प्रयत्न केला. हा केवळ शरीराचा खेळ आहे. मनाने तू यात गुंतू नकोस. पुढे तुलाच त्रास होईल, पण मनावर कुणाचाच ताबा नसतो. पद्मकलीचे मन आता तिचे राहिले नव्हते. गुरुराणीला हे माहीत होते की भावना दाबता येणार नाहीत. जे होतेय ते होऊ दे! अनुभवाने पद्मकली आपोआप शहाणी होईल. एकदा पद्मकलीने तिला सतावणारी एक शंका पर्णिकेला विचारली, इतके दिवस राजकुमारांशी संबंध आल्यानंतर गर्भ राहिला तर? पण पर्णिकेने तिला सांगितले की, ''तुम्ही आश्रमात आल्या दिवसापासून रोज सकाळी तुम्हाला जो काढा प्यायला दिला जातो; त्यामुळे आपले गर्भाशय अकुंचन पावते व आपणाला पुढील काळात कधीच गर्भ राहत नाही.'' हे पद्मकलीसाठी अनपेक्षित होते, पण आता ती काहीही करू शकत नव्हती. आश्रमातील स्त्रियांना मुले का होत नाहीत याचे उत्तर तिला आज मिळाले.

शेवटच्या रात्री गुरुराणीने मुद्दाम एक खेळ ठेवला. पद्मकली व तिच्या सर्व सख्यांचे उत्तरीय वस्त्र घेऊन ते एका भांड्यात ठेवले. पाचही अतिथींना बोलावून त्यांना एकेक उत्तरीय उचलण्यास सांगितले. जिचे उत्तरीय असेल तिला त्या अतिथीने घेऊन जावे असे ठरले. पद्मकली मनातून खूपच घाबरली. एकेक अतिथी पुढे येऊ लागला. उत्तरीय उचलून जिचे होते तिच्याबरोबर निघून जात होता. शेवटी एकच उत्तरीय उरले. कुटीमध्ये गुरुराणी, पद्मकली आणि राजकुमार तिघेच राहिले. पद्मकलीने एक दीर्घ श्वास सोडला. गुरुराणीने पद्मकलीकडे पाहून फक्त स्मितहास्य केले आणि दोघांना जाण्यास अनुमती दिली.

सकाळी सर्व आवरून राजकुमारासह सर्व जण जाण्यास निघाले. पद्मकलीचे डोळे पाण्याने भरले. रात्री राजकुमाराने तिला समजावले होते. लवकरच इथून घेऊन जाण्याचे आश्वासन दिले होते. राजकुमार त्यांचे पिताजी म्हणजेच राजा बलादित्य यांच्याशी बातचित करून तिला घेऊन जाणार होते. राजकुमाराने आत्मविश्वासाने सांगितले होते की, पिताजी माझा शब्द टाळणार नाहीत. मी लवकरच तुला घेऊन जाईन आणि काही कारणाने आता ते शक्य झाले नाही, तर कालांतराने मी राजा होईन तेव्हा तुला माझ्या अधिकारात तू जशी असशील तशी तुला नक्की घेऊन जाईन. पद्मकलीने साश्रू नयनांनी राजकुमाराला निरोप दिला.

दिवसामागून दिवस जात होते, पण राजकुमार धर्मादित्यचा काहीच निरोप येत नव्हता. पद्मकलीचा धीर आता सुटू लागला आणि एके दिवशी सायंकाळच्या वेळी आश्रमाच्या आवारात एक रथ आणि चार घोडेस्वार दाखल झाले. रथावरील तो राजबिंडा, पण वार्धक्याकडे झुकलेला पुरुष खाली उतरला आणि गुरुराणीच्या कुटीकडे चालू लागला. सारथ्याने रथ बाजूला लावून घोडे सोडले. घोडेस्वारही आपापले घोडे सोडून एका झाडाखाली विसावले. आश्रमातील सर्वांना ही दृश्यं नेहमीची असल्याने ते सर्व आपापल्या कामात मग्न होते. पद्मकलीला मात्र कुतूहल वाटत होते. कोण असावे हे? राजा बलादित्य तर नाहीत? पद्मकलीच्या मनात विचारांचे काहूर माजले असतानाच, पर्णिका धावत तिच्या कुटीकडे आली.

''पद्मकली, अगं महाराज बलादित्य आले आहेत! ते तुझ्याबद्दलच विचारणा करीत होते. रात्री भोजनानंतर तुमची भेट ठरली आहे.'' पर्णिकेने एका दमात सारे सांगून टाकले.

पद्मकलीही हरखून गेली; पण भेट रात्री का? आता का नाही? ...जाऊ दे; आपण का विचार करा! रात्री तर रात्री...

रात्री भोजनानंतर पर्णिकेने पद्मकलीला तयार केले. पद्मकलीनेही व्यवस्थित साजश्रृंगार केला. कुठेही उणीव ठेवली नाही. तिच्या मनात राजकुमार धर्मादित्यचाच विचार चालू होता. ते का आले नसावेत बरं; कदाचित महाराज एकटेच आधी मला पाहाण्यासाठी आले असावेत. त्यांच्या पसंतीनंतर राजकुमार मला नेण्यासाठी येतील. पद्मकलीने मनातील विचार झटकले आणि पर्णिका तिला घेऊन महाराजांच्या कुटीकडे निघाली.

''पर्णिके, तू येशील ना माझ्याबरोबर आत?''

''नाही गं, तुला दारात सोडेन आणि जाईन. मलाही प्रधानजींच्या सेवेसाठी जायचे आहे.''

पद्मकली यावर काहीही बोलली नाही. दोघीही सावकाशीने महाराजांच्या कुटीजवळ आल्या. ती कुटी आज विशेष सजवली होती. पर्णिकेने पद्मकलीला आत पाठविले आणि कुटीचे दार ओढून घेतले. पद्मकली दारातच उभी होती. कुटीतील शिसवी पलंगावर महाराज बसले होते. विशेष अतिथी असतील तरच अशा कुटीमध्ये व्यवस्था केली जात असे. महाराज पलंगावरून सावकाश उठले आणि पद्मकलीच्या दिशेने येऊ लागले. तिची हृदयाची धडधड वाढली. ती खाली नजर लावून त्यांच्या जवळ येण्याची चाहूल घेऊ लागली. तिच्या मनात आता नाना शंका येऊ लागल्या होत्या. जवळ येऊन महाराजांनी तिच्या हनुवटीला हात लावत तिचा चेहरा वर उचलला. पद्मकलीनेही नजर उंचावून महाराजांकडे पाहिले. पन्नाशीला आलेल्या महाराजांचा चेहरा अजूनही तरतरीत दिसत होता. ज्या महाराजांच्या एका दर्शनासाठी लोक धडपडत असत त्यांना पद्मकली आज इतक्या जवळून पाहत होती.

''वाह! वाह!! सुंदर!!! राजकुमारांनी वर्णन केले त्यापेक्षाही किती तरी सुंदर आहेस तू!'' महाराजांच्या बोलण्याने पद्मकली हरखून गेली. तिला क्षणभरच आपल्या व राजकुमारांच्या सहजीवनाचे चित्र समोर दिसले. महाराज कुटीच्या दाराकडे गेले आणि त्यांनी कुटीच्या दाराची कडी लावून घेतली. पद्मकली नुसतीच महाराजांच्या हालचालीकडे पाहात होती. कडी लावून महाराज कोपऱ्यातील एकेका समईकडे गेले, त्यांच्या वाती बारीक केल्या. कुटीमध्ये अंधूक प्रकाश पसरला. महाराज सावकाश पद्मकलीला घेऊन पलंगाकडे गेले. आता मात्र पद्मकलीच्या काळजाची धडधड आणखीच वाढली. पुढे काय होणार आहे याची पुसटशी कल्पना आता तिला येऊ लागली, पण ती काहीच करू शकत नव्हती. तिला पलंगावर बसवून महाराज तिचे एकेक अभूषण उतरवू लागले. अभूषणांबरोबर जणू ते राजकुमाराबरोबरच्या संसाराची तिची एकेक स्वप्न काढून फेकत होते. पद्मकलीच्या काळजातली धडधड आता पूर्ण थांबली आणि तिच्यातली प्रशिक्षित गणिका जागृत झाली.

सकाळी पद्मकलीला जाग आली तेव्हा सूर्य चांगलाच वर आला होता. एखादी स्त्री जेव्हा अशा विशेष सेवेत असायची तेव्हा सकाळी उठण्यासाठी तिला आश्रमाच्या नियमातून थोडी सवलत मिळत असे, पण पद्मकलीला उठण्यासाठी आज अंमळ उशीरच झाला होता. त्याला कारणही तसेच होते.

महाराज पन्नाशीचे असले, तरी त्यांचा उत्साह विशीतल्या तरुणाचा होता. त्यामुळे पद्मकलीला झोपायला रात्रीचा चौथा प्रहर उजाडला होता. पद्मकली बाहेर आली. महाराज आणि त्यांचा ताफा केव्हाच निघून गेला होता. पद्मकली मूकपणे तिची नित्यकर्म करू लागली. तिची सारी स्वप्नं एका रात्रीत भंगली होती. इतक्यात, पर्णिका तिच्याकडे आली.

''पद्मकली, अगं काय झालं रात्री?'' हे ऐकताच पद्मकली पर्णिकेच्या कुशीत शिरली आणि इतका वेळ रोखून धरलेला अश्रूंचा बांध फुटला. पद्मकलीने पोटभर रडून घेतले. पर्णिका केवळ तिच्या डोक्यावरून हात फिरवत राहिली. तिला कळून चुकले की रात्री काय झाले असेल.

''आपल्या नशिबात हेच आहे पद्मकली; आपण ते बदलू शकत नाही. मला वाटले होते तुझ्या बाबतीत तरी भविष्य बदलेल, पण नाही. हा समाज आपल्याला उजळ माथ्याने कधीच स्वीकारणार नाही. उलट त्याची गरज भागल्यावर आपल्याला कुणाहीपुढे घास टाकल्यासारखे टाकून देईल. तुझा राजकुमारही त्यातलाच.''

पण पद्मकलीला पटतच नव्हते की राजकुमारांना हे माहीत असेल. कदाचित त्यांच्या अपरोक्ष महाराज आले असतील, पण आता विचार करून काहीही होणार नव्हते. भावनेचा भर ओसरल्यावर पद्मकली बाजूला झाली.

''अय्या! महाराजांनी तुला कंठा दिला वाटतं?'' पद्मकलीच्या गळ्याकडे पाहात पर्णिका म्हणाली. पद्मकलीने गळ्याकडे पाहिले आणि तिला आठवले; रात्रीचा पहिला भर ओसरला तेव्हा खुशीत येऊन महाराजांनी पद्मकलीच्या गळ्यात स्वतःच्या गळ्यातील मोत्याचा किमती कंठा घातला होता. पद्मकलीने तो कंठा काढून हातात घेतला आणि काहीही न बोलता ती कुटीकडे चालू लागली.

## ।।२।।

पद्मकलीला आश्रमात येऊन आता जवळ जवळ चौदा वर्षे होऊन गेली होती. आश्रमाच्या नियमाप्रमाणे बारा वर्षांचा काळ संपला होता आणि पद्मकली तिच्या मनाप्रमाणे आश्रमाबाहेर जाण्यास स्वतंत्र होती, पण अजूनही तिने बाहेर जाण्याबाबत विषय काढला नव्हता. तिच्या सख्या एक एक करीत केव्हाच

निघून गेल्या होत्या. पर्णिकाही एका व्यापाऱ्याबरोबर घरोबा करून निघून गेली होती, पण पद्मकली काहीही बोलत नव्हती. त्यामुळे गुरुराणीच्या मनात वेगळेच विचार घोळू लागले. गुरुराणीनेही आता साठी ओलांडली होती. पद्मकली तशी हुशार होती. ती एका गटाची शिक्षिका होती. पद्मकलीची शिकविण्याची पद्धत आणि तिचा स्वभावही फार चांगला होता. म्हणून गुरुराणीने पद्मकलीला तिची उत्तराधिकारी घोषित करण्याचा विचार केला. फक्त पद्मकलीशी बोलून तिचा होकार मिळविणे बाकी होते. एके दिवशी आलेल्या एका व्यापाऱ्यांच्या तांड्याबरोबर एक बातमी आश्रमात येऊन थडकली. महाराज बलादित्यांचे काही दिवसांपूर्वी निधन झाले असून, राजकुमार धर्मादित्य आता राजा झाले आहेत. पद्मकलीला अपेक्षित असलेली बातमी मिळाली होती. त्यानंतर काही दिवसांतच एका संध्याकाळी पद्मकली काही तरी निश्चय करून गुरुराणीच्या कुटीमध्ये तिला भेटण्यासाठी आली.

''गुरुमाता, आत येऊ का?'' पद्मकलीने नम्रपणे विचारले.

''ये पद्मकली, अगं ये ना! मलाही तुला भेटायचे होते'' पद्मकली आत येऊन गुरुराणीसमोर बसली. ''बोल, काय काम काढलंस?'' गुरुराणीने विचारले.

''काही निर्णयांबाबत तुमच्याशी चर्चा करायची होती, पण तुम्ही काय बोलणार होतात माझ्याशी?''

''ते फारसं महत्त्वाचं नाही, तुला काय बोलायचंय ते बोल''

''मी आश्रमातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे.'' पद्मकलीने एका वाक्यात सांगितले.

''कुणाबरोबर?''

''इथून बाहेर पडून महाराज धर्मादित्यांकडे जाण्याचा विचार आहे.''

''ठीक आहे, पण पुन्हा विचार कर. एकटीच बाहेर पडत आहेस. महाराजांनी तुला स्वीकारले नाही, तर... एकदा बाहेर पडल्यानंतर आश्रमाची दारे तुझ्यासाठी कायमची बंद होतील. खरं म्हणजे मी तुला माझी उत्तराधिकारी घोषित करण्याचा विचार करीत होते.''

पद्मकली यावर काहीही बोलली नाही. फक्त खाली पाहत राहिली. ''ठीक आहे, जा तू आता. उद्या संध्याकाळी तुझा निश्चित निर्णय मला सांग. मग पुढचे बघू...'' गुरुराणीने पद्मकलीला निरोप दिला. काहीही न बोलता पद्मकली उठून बाहेर आली. बाहेर संध्याकाळ जरा जास्तच गडद झाल्यासारखी वाटत होती.

पद्मकलीने धर्मादित्याकडे जाण्याचा निर्णय घेतला आणि जवळ जवळ दोन महिने प्रवास करून पद्मकली महाराज धर्मादित्याच्या राजधानीत पोहोचली. पद्मकलीचे बाहेर जाण्याचे निश्चित झाल्यानंतर गुरुराणीने तिचे पारपत्र बनवून, एका व्यापारी तांड्याबरोबर तिची बाहेर जाण्याची सोय करून दिली होती. त्याच तांड्याबरोबर ती इथपर्यंत आली होती. पद्मकलीला इच्छित स्थळी सोडून व्यापारी तांडा पुढे निघून गेला. आता पुढची वाटचाल तिला एकटीला करायची होती. राजवाड्याच्या प्रशासनाकडून तिने महाराजांची भेट निश्चित केली. तिला एक आठवड्यानंतरची भेट मिळाली. तोपर्यंत पद्मकली धर्मशाळेत राहिली. गुरुराणीने निघताना पद्मकलीला काही द्रव्य दिले होते. त्यामुळे तिला कोणत्याही प्रकारची अडचण आतापर्यंत आलेली नव्हती. फक्त महाराजांशी भेट होऊन तिचे इप्सित साध्य होण्याची ती अतुरतेने वाट पाहत होती. अखेर तो दिवस उजाडला. पद्मकली सकाळी लवकरच तयार होऊन महाराजांच्या भेटीला राजवाड्याच्या अतिथीगृहात आली. थोड्याच वेळात महाराज अतिथीगृहात आले. पद्मकली उठून महाराजांना सामोरी गेली. पद्मकलीला पाहाताच महाराज थबकले. तिच्याकडे एकटक पाहत राहिले. नकळत त्यांच्या तोंडून उद्‌गार निघाले, ''पद्मकली, हो पद्मकलीच!'' पद्मकलीने स्मितहास्य करीत त्यांना दुजोरा दिला आणि ती लाजून खाली पाहू लागली.

''किती दिवसांनंतर भेटतेस तू?'' धर्मादित्य म्हणाला.

''तुम्हीच तर वेळ लावलात भेटायला. मी केव्हाची तयार होते!'' पद्मकलीने धर्मादित्याला त्याच्या चुकीची जाणीव करून दिली.

''असो, बोल इकडे कसे येणे केले? माझ्याकडून काही मदत हवी का?'' धर्मादित्याने विषय बदलला, पण या प्रश्नासरशी पद्मकली दचकून धर्मादित्याकडे पाहू लागली.

''मी कायमची तुमच्याकडे आले आहे. तुम्ही न्यायला आला नाहीत, म्हणून मलाच यावे लागले.'' पद्मकली बिचकत म्हणाली. धर्मादित्य काही क्षण तिच्याकडे एकटक पाहत राहिला. पद्मकलीला त्या नजरेला नजर देणे अशक्य झाल्याने ती लाजून खाली पाहू लागली.

''पद्मकली, कसं सांगू तुला? आता हे शक्य नाही.''

''काय, शक्य नाही?'' पद्मकली नखशिखांत हादरली. तिच्या कपाळावर घर्मबिंदूंनी दाटी केली. ती भेदक नजरेने धर्मादित्याकडे पाहत राहिली. तिच्या नजरेतील प्रेमाची जागा आता भीती, आश्चर्य, राग या अनेकविध भावनांनी

घेतली.

''पद्मकली, तुझ्याकडून पुन्हा आश्रमात आल्यानंतर मला पुन्हा केव्हा तुला भेटेन असे झाले होते, पण नियमांनी बांधल्याने ते शक्य नव्हते. शिक्षण संपल्यावर पिताजी मला न्यायला आले तेव्हा मी त्यांना तुझ्याबद्दल सांगितले, पण ते म्हणाले की तुमच्यासारख्या स्त्रिया केवळ राजेरजवाडे व श्रीमंतांच्या मनोरंजनाकरिता असतात. त्यांच्याशी विवाह करणे शास्त्रसंमत नाही. तुझी इच्छाच असेल तर तू राजा झाल्यानंतर तिला राज्यात आणून नगरात तिची राहण्याची सोय करू शकतोस, पण तेही केवळ मनोरंजनासाठी. मी मात्र पिताजींकडे हट्टच धरला. तू अजूनही केवळ माझीच असणार, असे मी त्यांना निश्चयपूर्वक सांगितले. तेव्हा ते स्वतः तुला पाहण्यासाठी तुमच्या आश्रमात आले. तिथून आल्यानंतर तू भ्रष्ट झाली असून, तूच मला नाकारल्याचे त्यांनी सांगितले. मग मीही सारे कष्टपूर्वक विसरून राजधानीत आलो.'' धर्मादित्याने सारी कहाणी एका दमात सांगितली.

पद्मकली दीर्घ श्वास सोडत धर्मादित्याकडे पाहत म्हणाली, ''पण तुम्हाला एकदाही माझ्याकडे येऊन खरे-खोटे करावेसे वाटले नाही?''

''मी राजधर्माने बांधला गेलो होतो आणि तसेही त्याने काय फरक पडला असता?'' धर्मादित्य त्याची लंगडी बाजू सावरत म्हणाला.

''काय फरक पडतोऽऽ? तुझ्या पिताजींनी मी भ्रष्ट झाल्याचे सांगितले. ते खरेही होते, पण मला भ्रष्ट कुणी केले हे नाही सांगितले तुला?'' पद्मकलीचे लगबगीने तिच्या झोळीतून कंठा काढला आणि धर्मादित्याच्या अंगावर फेकला. ''हे घे बघ, मला कुणी भ्रष्ट केले ते! मी केवळ आतापर्यंत तुझ्यासाठीच जगत होते. नाही तर तुझ्या पिताजींनी मला त्याच रात्री मारून टाकले.''

धर्मादित्य त्या कंठ्याकडे एकटक पाहत होता. त्याच्या पिताजींचा तो आवडता कंठा. त्या दिवशी पद्मकलीच्या आश्रमात जाऊन आल्यानंतर त्यांच्या गळ्यात तो नव्हता. आपल्यालाही ते लक्षात आले होते, पण त्याचा फारसा विचार त्या वेळी आपण केला नाही. त्यांना विचारलेही नाही त्याबद्दल. आज त्या कंठ्याच्या रूपाने सत्य समोर आले होते. धर्मादित्य मट्कन आसनावर बसला. त्याचा चेहरा अगदी म्लान झाला होता.

''पद्मकली मला माफ कर...!'' धर्मादित्य वर पाहत म्हणाला, पण हे ऐकायला पद्मकली तिथे होतीच कुठे. ती केव्हाच तिथून निघून गेली होती.

लगबगीने बाहेर पडलेली पद्मकली तशीच चालत राहिली. किती तरी वेळ...

आता दुपारचे उन्हे कलून सायंकाळ होऊ लागली होती. नगर केव्हाच मागे पडले होते. पद्मकली आता नगराशेजारच्या घनदाट जंगलात पोहोचली होती, पण तिची पावले काही केल्या थांबत नव्हती. चालताना तिचे पूर्वीचे जीवन चित्रपटासारखे तिच्या डोळ्यासमोरून सरकत होते. जंगलात चालता चालता ती मधोमध असलेल्या नदीच्या किनारी आली आणि तिथेच बसली. संध्याकाळ दाटून आली होती. जंगल असल्याने अंधार थोडा जास्तच वाटत होता. पद्मकली तशीच काही क्षण बसून राहिली. थोड्याच वेळात अंधार दाटून आला आणि रात्र पडली. इतका वेळ विचारात मग्न असलेली पद्मकली मग भानावर आली. पुढे काय करायचे हे तिला सुचत नव्हते. एक तर मृत्यूला जवळ करणे किंवा असेच गणिकेचे जीवन जगणे इतकेच दोन पर्याय तिच्यासमोर होते. तिचा निर्णय होत नव्हता. पद्मकली नदीकिनारी असल्याने रात्र चढू लागली तशी तिथे जंगली श्वापदांची जाग जाणवू लागली. ती उठून जवळच्याच एका डेरेदार वृक्षाच्या ढोलीत जाऊन बसली. आता तिच्या मनातील भीती, राग, द्वेष सगळ्या भावभावना बोथट झाल्या होत्या. रात्रभर ती त्या ढोलीतच पडून राहिली.

पहाट होताच ती ढोलीतून खाली आली. नदीवर जाऊन तिने तोंड धुतले. थोडे पाणी पिऊन ती बाहेर आली. काय करावे या विचारात काही अंतर ती चालून गेली. थोड्याच अंतरावर एक ऋषी तिला ध्यानस्थ बसलेले दिसले. याचा अर्थ जवळपास कुठे तरी आश्रम असावा. ती ऋषींसमोर जाऊन बसली व त्यांचे ध्यान संपण्याची वाट पाहू लागली. काही वेळातच ध्यान संपवून ऋषींनी डोळे उघडले. पद्मकलीने त्यांना नमस्कार केला.

''सुखी हो मुली!'' ऋषींनी दिलेल्या आशीर्वादाने तिला हसू फुटले.

''का हसतेस,'' ऋषींनी नकळत विचारले.

''जिच्यावर आभाळ कोसळले आहे अशा स्त्रीला तुम्ही सुखी होण्याचा आशीर्वाद देत आहात, म्हणून हसायला आले'' पद्मकली सारे स्पष्टच बोलली.

''असे काय आभाळ कोसळले आहे तुझ्यावर?'' ऋषींनी तिला प्रेमाने विचारले. मग पद्मकलीने तिची आश्रमात आल्यापासून ते आतापर्यंतची सगळी कहाणी सांगितली. ऋषींनी सारे शांतपणे ऐकून घेतले. पद्मकलीचे बोलून झाल्यावर ते म्हणाले, ''आता पुढे काय करणार आहेस तू?''

''अजून काही ठरविले नाही'' पद्मकली म्हणाली.

''ठीक आहे, चल माझ्याबरोबर. तुझा पुढचा निर्णय होईपर्यंत माझ्या

आश्रमात राहा. इथे जवळच माझे गुरुकुल आहे.''

''गुरुकुलात? कसे शक्य आहे. माझ्यासारख्या स्त्रीला तुम्ही गुरुकुलात घेऊन जाणार?''

''मग काय झाले? तू तुझे पूर्वायुष्य संपवून बाहेर पडली आहेस, नवीन आयुष्य जगायला. उलट त्यात माझ्याकडून काही मदतच होईल तुला. आता तुला असेच वाऱ्यावर सोडले, तर तुला पुन्हा तोच मार्ग स्वीकारावा लागेल किंवा मृत्यूला कवटाळावे लागेल. त्यामुळे माझ्या आश्रमात तू हवे तेवढे दिवस राहू शकतेस, चल!'' ऋषी उठून चालू लागले आणि त्यांच्या पाठोपाठ पद्मकलीही मूकपणे चालू लागली.

पद्मकली आश्रमात आली. आश्रमाचे जीवन तिच्या परिचयाचे असल्याने ती लवकरच आश्रमात रूळली. हा आश्रम म्हणजे एक गुरुकुल होते. राज्यातील विविध ठिकाणचे, विविध स्तरांतील विद्यार्थी तेथे शिकण्यासाठी राहत होते. वेगवेगळ्या विषयांचे शिक्षण तिथे दिले जात होते. पद्मकलीला ज्या ऋषींनी या आश्रमात आणले ते आश्रमाचे कुलगुरू होते. पद्मकलीच्या आश्रमापेक्षा हा आश्रम किती तरी पटीने मोठा होता. पद्मकलीचे मन आता थोडे शांत होऊ लागले. आश्रमातील धार्मिक, आध्यात्मिक वातावरणामुळेही पद्मकलीचे मन थोडे सावरले. असेच तीन-चार महिने गेले. एक दिवस आश्रमात येणाऱ्या अशाच काही अतिथींनी एक बातमी आणली. महाराज धर्मादित्य गेले दोन महिने आजारी असून, त्यांच्यावर कोणत्याही वैद्याच्या औषधाचा परिणाम होत नाही. आजवर देशोदेशीचे अनेक वैद्य येऊन गेले, पण काहीही उतार नाही. उलट आजार बळावतोच आहे. ही बातमी ऐकल्यानंतर पद्मकली मनातून थोडी अस्वस्थ झाली, पण ती काहीही करू शकत नव्हती. दोनच दिवसांनी आश्रमाचे कुलगुरू कुठे तरी निघून गेले. ते कुठे गेले हे कुणालाच माहीत नव्हते. चार दिवसांनी ते परतले. दुसऱ्या दिवशी सकाळीच त्यांनी पद्मकलीला बोलावले. पद्मकली कुलगुरूंच्या कुटीमध्ये गेली.

''गुरुदेव, आत येऊ का?''

''ये पद्मकली ये, अशी समोर बैस!'' समोरच्या आसनाकडे अंगुलीनिर्देश करीत कुलगुरू म्हणाले. पद्मकलीने कुलगुरूंना नमस्कार केला आणि ती समोर बसली.

''पद्मकली, उद्या तुला राजवाड्यात जाण्यासाठी निघायचे आहे.''

''काय? कशासाठी?'' पद्मकली आता बुचकळ्यात पडली.

''सांगतो, सारे विस्ताराने सांगतो. हे बघ पद्मकली, महाराज धर्मादित्य आजारी असल्याचे तुला ठावूकच आहे. त्यांना मी नुकताच भेटून आलो. त्यांचा आजार हा शारीरिक नाही, तर मानसिक आहे. तुझ्यावर झालेल्या अन्यायामुळे ते व्यथित आहेत. तेव्हा त्यांना मी एक उपाय सुचविला आहे की, एखाद्या साध्वीचे चरणतीर्थ एक मास महाराजांनी प्राशन करावे. त्यामुळे महाराजांचा आजार बरा होईल. ती साध्वी म्हणून तू एक मास राजवाड्यात राहायचे आहे.'' कुलगुरूंनी सारे विस्ताराने सांगितले.

''पण महाराजांनी मला पाहिले तर...!'' पद्मकलीने शंका उपस्थित केली.

''नाही मी त्यांना सांगितले आहे की, एक मास पूर्ण होईपर्यंत त्या साध्वीचे मूखदर्शन करायचे नाही. असे केल्यास उपचार पूर्ण होणार नाहीत, तसेच मी स्वतः साध्वीला तुमच्या समोर घेऊन येत नाही तोपर्यंत तुम्ही तिला पाहू नका. त्यामुळे महाराज ही अट मोडतील असे वाटत नाही. तू निश्चिंत राहा, पण तू मात्र भावनेच्या भरात वावगे काही करू नकोस, म्हणजे झाले'' पद्मकलीने मानेनेच होकार दिला. राजवाड्यात जायला मिळणार म्हणून तिचे मन प्रफुल्लित झाले होते, पण महाराजांना मात्र एक मास भेटता येणार नव्हते म्हणून थोडे वाईटही वाटत होते. कुलगुरूंनी सर्व आवश्यक सूचना देऊन पद्मकलीला राजवाड्यात पाठविले.

राजवाड्यात आल्यापासून एक महिना रोज राजसेवक येऊन पद्मकलीचे चरणतीर्थ घेऊन जात होते. उपचार सुरू केल्यापासून आठच दिवसांत महाराजांच्या आरोग्यात सुधारणा झाली होती. पंधरा दिवसांनंतर तर महाराज राजवाड्यात हिंडू-फिरू लागले होते. चरणतीर्थ घ्यायला येणाऱ्या सेवकांकडून तिला रोज नवी माहिती मिळत होती. कधी कधी ती दुरूनच महाराजांना फिरताना पाही, तेव्हा धावत जाऊन त्यांना भेटावे असे तिला वाटे, पण ती स्वतःला सावरत असे. कुलगुरूंचे शब्द आठवून ती शांत होई. एकदाचा महिन्याचा शेवटचा दिवस आला. सकाळीच राजसेवक चरणतीर्थ घेऊन गेले होते. कुलगुरूंनी सांगितलेली मुदत पूर्ण झाली होती. उद्या काय होणार? आपल्याला पुन्हा आश्रमात जावे लागणार, या विचाराने पद्मकली अस्वस्थ झाली होती. ती कुलगुरूंची अतुरतेने वाट पाहत होती. सायंकाळी कुलगुरू राजवाड्यात आले. त्यांचा उपचार यशस्वी झाला होता. धर्मादित्याने त्यांचा राजदरबारात जाहीर सत्कार केला. दुसऱ्या दिवशी सकाळी साध्वीला भेटायचे निश्चित झाले. कुलगुरूंच्या इच्छेप्रमाणे ही भेट एकांतात ठरली होती. केवळ

धर्मादित्य, कुलगुरू आणि साध्वी असे तिघेच भेटणार होते.

सकाळी लवकरच पद्मकली तयार होऊन कुलगुरूंच्या बरोबर महाराजांच्या भेटीला निघाली. तिच्या हृदयाची धडधड वाढली होती. काय होणार; या विचाराने तिचे मन अस्वस्थ होते. अतिथीगृहात पद्मकली आणि कुलगुरू येऊन बसले. थोड्याच वेळात महाराजांचे आगमन झाले. नमस्कार करताना महाराजांनी साध्वीला पाहिले आणि ते स्तंभित झाले. काही क्षण ते केवळ साध्वी म्हणजेच पद्मकलीकडे पाहतच राहिले.

''पद्मकली म्हणजेच साध्वी?'' महाराजांच्या तोंडून उद्‍गार निघाले.

''होय महाराज, पद्मकली म्हणजेच साध्वी आहे. तुमचा आजार हिच्याच चरणतीर्थाने बरा झाला आहे. कारण तो हिच्याच विचाराने तुम्हाला झाला होता. असो, माझे काम झाले आहे. मी बाहेर थांबतो. तुम्ही एकांतात बोला...'' आणि कुलगुरू बाहेर निघून गेले. पद्मकली खाली पाहत होती. महाराज धर्मादित्य तिच्या जवळ गेले. हाताने तिची हनुवटी धरून तिचा चेहरा वर उचलला. पद्मकली आरक्त नजरेने त्यांच्याकडे पाहत होती. चेहऱ्यावर आनंद असला तरी डोळे आश्रूंनी भरले होते.

''पद्मकली, आज मी खूप खूष आहे. माग तुला हवे ते माग! आज मी ते दिलखुलासपणे देईन.''

''मला काही नको महाराज...''

''असे कसे, घ्यावे तर लागेलच. माग तू...''

''ठीक आहे, आपण मला एक मास आपल्या पत्नीचा दर्जा द्यावा. आपली पत्नी म्हणून राजवाड्यात ठेवून घ्यावे. इतकेच मला हवे आहे.'' पद्मकलीने विचारपूर्वक आपली इच्छा सांगितली.

धर्मादित्य गंभीर झाला. काय करावे कळेना, पण तो वचनात आडकला होता. आता त्याला वचन पाळावेच लागणार होते अन्यथा त्याच्या राजकुळाला दोष लागणार होता.

''ठीक आहे. मी उद्यापासून एक मास पत्नी म्हणून तुझा स्वीकार करेन. आणखी काही...''

''बस महाराज, माझी इतकीच इच्छा होती.'' असे म्हणून पद्मकली तिच्या कक्षाकडे निघून गेली. धर्मादित्य विचार करत राहिला. एक महिन्याचा तर प्रश्न आहे. महिन्याने पद्मकली पुन्हा निघून जाईल. राजा म्हणून मला इतका अधिकार तर असू शकतोच ना! त्या अधिकारातच मी पद्मकलीला राजवाड्यात ठेऊन

घेईन. त्यामुळे तिच्यावरील अन्यायाचेही थोडेफार परिमार्जन झाल्यासारखे होईल. असा विचार करीतच धर्मादित्य राजदरबाराकडे निघाला, पण आपल्या निर्णयामुळे येणाऱ्या पुढच्या वादळाची त्याला कल्पना नव्हती.

धर्मादित्याने दुसऱ्याच दिवशी पद्मकलीला पत्नी म्हणून स्वीकारले आणि तिला राहण्यासाठी राजवाड्यातील एक कक्ष दिला. धर्मादित्याच्या इतर सहा राण्यांबरोबर पद्मकलीही राजवाड्यात राहू लागली. खरे तर हे इतर राण्यांना तसेच राजवाड्यातील कुणालाच रूचले नव्हते. पद्मकलीला राजवाड्यात न ठेवता बाहेर कुठेही ठेवले असते तर कुणाचा आक्षेप नव्हता, पण धर्मादित्यासमोर बोलण्याची कुणाचीही ताकद नव्हती. दिवस जात होते. पद्मकली राजवाड्यात राहू लागल्याला आता पंधरा दिवस होऊन गेले. धर्मादित्य तर सध्या रोज तिच्याच महालात राहत होता. बोल बोल म्हणता राज्यात सर्वदूर ही बातमी पोहोचली. एके दिवशी राजगुरूंसह राज्यातील प्रतिष्ठित व्यक्ती आणि वनांत राहणारे ऋषीमुनी यांचे शिष्टमंडळ धर्मादित्याला भेटण्यास आले.

''महाराज, गेले काही दिवस राजवाड्यात एका गणिकेचा निवास आहे आणि हे जे चालले आहे ते राज्याच्या हिताचे नाही. त्यामुळे राज्याची सांस्कृतिक घडी विसकटेल,'' राजगुरूंनी सर्वांतर्फे विषयाची प्रस्तावना केली.

''मी वचनाने बांधलो गेलो आहे, गुरूदेव! एक मास तिला पत्नीचा दर्जा देऊन राजवाड्यातच ठेवावे लागेल, पण यामुळे सांस्कृतिक घडी विसकटण्याचे कारण काय?'' धर्मादित्याने विचारले.

''यथा राजा तथा प्रजा! आपण राजरोस असे केल्यावर प्रजाही गणिकांना घरी आणून ठेवेल आणि घराघरांत अनाचार माजेल,'' उपस्थित ऋषींपैकी एक जण म्हणाले.

''मग मी काय करावे? वचनामुळे मी तिला एक मासपर्यंत राजवाड्यातून बाहेर काढू शकत नाही. त्यामुळे वचन मोडल्याचा कलंकही लागेल. हेही राजा म्हणून योग्य नाही. आपण प्रायश्चित्त सांगावे,'' धर्मादित्य नम्रपणे म्हणाला.

''आम्ही प्रायश्चित्त सांगणारे कोण? आणि दुसरे म्हणजे वचन कोणास द्यावे, यासही मर्यादा असतात. त्याचाही आपण भंग केला आहे. यासाठी पंच नेमून आपणावर महाभियोग चालवावा लागेल,'' राजगुरूंनी हेतू स्पष्ट केला.

''महाभियोग? यापेक्षा वेगळा मार्ग नाही का?'' धर्मादित्य आता पुरता घाबरला. महाभियोग म्हणजे वेळप्रसंगी राजगादी सोडण्याची वेळही येऊ शकते. कारण ते सर्व नेमलेल्या पंचांच्या हाती असते. महाभियोग पूर्ण होईपर्यंत

राजाचे सर्व अधिकार गोठवले जातात.

''नाही महाराज, वेगळा मार्ग नाही. लवकरच महाभियोगाचा दिवस आम्ही जाहीर करू,'' शिष्टमंडळ आल्या पावली निघून गेले, तरी धर्मादित्य किती तरी वेळ तिथेच बसून होता.

चार-पाच दिवसांतच राजगुरूंनी महाभियोगाचा दिवस धर्मादित्याला येऊन सांगितला आणि राज्यकारभाराची सूत्रे प्रधानांच्या हाती दिली. धर्मादित्याला आता राजा म्हणून कोणतेही अधिकार उरले नव्हते. महाभियोगाचा दिवसही असा निवडला होता की नेमका त्याच्या आदल्याच दिवशी पद्मकलीचा राजवाड्यातील एक मास पूर्ण होणार होता आणि महाभियोगाच्या दिवशी पहाटे ती राजवाडा सोडणार होती.

दिवस भरभर निघून गेले. आदल्या रात्री धर्मादित्य पद्मकलीच्या महालात आला. त्याने पद्मकलीला महाभियोगाची कल्पना दिली होती. पहाटे निघून न जाता तिनेही राजवाड्यात थांबावे असे धर्मादित्यने तिला सुचविले, पण पद्मकली तयार झाली नाही. पद्मकलीने मागितलेली मुदत संपली होती आणि ती निघून गेल्याने कदाचित धर्मादित्याचे पारडे जड होऊन त्याची सुटकाही झाली असती. तेच जर ती थांबली तर महाभियोगाचा निर्णय धर्मादित्याच्या विरुद्ध लागू शकत होता. धर्मादित्याने केवळ स्वतःच्या सुखासाठी पद्मकलीला थांबविले असा त्याचा अर्थ निघाला असता. पद्मकलीने धर्मादित्याला हे सारे समजाविले आणि ती जाण्यासाठी ठाम राहिली. हे सारे बरोबर असले, तरी धर्मादित्य आता सर्व बाजूंनी एकटा पडला होता. त्याला आता आधाराची गरज होती, पण पद्मकलीही निघून चालली होती.

पहाटे दोघेही नित्यकर्म उरकून आपापल्या वाटेला लागले. पद्मकली राजवाडा सोडून निघून गेली आणि धर्मादित्य राजसभेकडे निघाला. राजसभेत आज तोबा गर्दी झाली होती. महाभियोगाचा खटला कधीतरीच पाहायला मिळत असल्याने साऱ्यांनाच उत्सुकता होती. महाराजांचे राजसिंहासन आज मोकळेच होते. त्याच्या आजूबाजूला आसनांवर पंच बसले होते. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या प्रत्येक वर्णातील एकेक प्रतिष्ठित आणि वनांतील एक ऋषी असे पाच पंच समोर बसले होते. धर्मादित्याला बसण्यास दरबाराच्या मधोमध एक आसन होते. धर्मादित्य त्यावर बसला आणि महाभियोगाचा खटला सुरू झाला. धर्मादित्याने आपली संपूर्ण बाजू पंचांसमोर मांडली. यानंतर राज्यातील प्रतिष्ठित, ऋषीमुनी, शिक्षक यांनी आपापली मते मांडली. यापूर्वीच्या घटनांचा

ऊहापोह करण्यात आला. त्याचा समाजावरील परिणामांचा विचार झाला आणि सरतेशेवटी पंचांनी धर्मादित्याला पदभ्रष्ट केले. धर्मादित्याचा मोठा मुलगा वयाने लहान असल्याने तो सज्ञान होईपर्यंत राजगुरू आणि प्रधानांकडे राज्यकारभाराची सूत्रे सोपविली आणि आजच संध्याकाळी धर्मादित्याने राजवाडा सोडून वनात जावे, असा आदेश देण्यात आला. महाभियोग संपला. राजसभा पांगली. तोपर्यंत दुपार टळून गेली होती. धर्मादित्याने आपल्या महालात येऊन राजवस्त्रे उतरवली. साध्या वेशात त्याने साऱ्या राण्यांचा आणि आपल्या कन्या-पुत्रांचा निरोप घेतला. आता धर्मादित्याला सारे आयुष्य वनात घालवावे लागणार होते. संध्याकाळी त्याने वनाच्या दिशेने प्रयाण केले. वनात पोहोचेपर्यंत रात्र उलटून गेली होती. रात्रीचा चौथा प्रहर सुरू झाला. पूर्वेकडून पहाटवारा सुटला. धर्मादित्याच्या मनात पद्मकलीचा विचार आला. त्यासरशी तो पद्मकलीला घेऊन येणाऱ्या ऋषींच्या आश्रमाच्या दिशेने निघाला. आश्रमात पहाटेची गडबड सुरू होती. धर्मादित्य थेट ऋषींच्या कुटीत गेला, पण त्याचा भ्रमनिरास झाला. पद्मकली आश्रमात आलीच नव्हती. धर्मादित्य आल्या पावली मागे फिरला. तसाच चालत तो नदीकिनारी आला. स्नानासाठी त्याने वस्त्रे उतरवून बाजूला ठेवली आणि पाण्यात उतरणार तोच त्याला थोड्या अंतरावर नदीकिनारी कुणीतरी पहुडलेले दिसले. धावतच धर्मादित्य त्या दिशेला गेला. एक स्त्री किनाऱ्यावर पहुडली होती. धर्मादित्य जवळ गेला आणि त्या स्त्रीचा चेहरा पाहून स्तंभित झाला. ती पद्मकली होती. धर्मादित्याने लगबगीने तिची नाडी पाहिली, पण ती केव्हाच गतप्राण झाली होती. धर्मादित्याच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या. जेव्हा पद्मकलीला धर्मादित्याच्या आधाराची गरज होती तेव्हा तो तिला हयात असतानाही आधार देऊ शकला नाही आणि आज त्याला पद्मकलीच्या आधाराची गरज असताना ती कायमची त्याला सोडून गेली. दिवसभर धर्मादित्य पद्मकलीचे कलेवर मांडीवर घेऊन असाच निश्चल बसून राहिला. सूर्य आता मावळतीकडे कलू लागला. नाईलाजाने धर्मादित्य उठला. शेवटी तिथेच चिता रचून त्याने पद्मकलीला भडाग्नी दिला आणि नदीत अंघोळ करून तो अज्ञाताच्या वाटेने चालू लागला...!

॥समाप्त॥

# लेखकाचा परिचय!



**संपूर्ण नाव : संदीप दशरथ बोडके**
**शिक्षण : बी.ए. (मराठी साहित्य)**

**सस्नेह नमस्कार...!**

मी मूळचा पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातला असलो, तरी माझा जन्म मात्र परेल, मुंबई इथला. बालपणाची पहिली तीन-चार वर्षे लालबाग, भायखळा, चेंबूर या भागात गेली.

**शालेय शिक्षण :** प्राथमिक शिक्षण तुर्भे (नवी मुंबई) येथील जीवन शिक्षण विद्या मंदिर या जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. पुढील पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण बाजूलाच असलेल्या डॉ. सी. वि. सामंत विद्यालयात झाले. मी दहावी १९९३ मध्ये उत्तीर्ण झालो.

**कॉलेज जीवन :** पुढील शिक्षणासाठी वाशीतील मॉडर्न कॉलेज (सध्याचे कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय) येथे प्रवेश घेतला. १९९५ मध्ये बारावी झाल्यानंतर दोन वर्षे डीएड्साठी प्रयत्न केले, पण प्रवेश मिळाला नाही. शेवटी १९९७ मध्ये बीएसाठी मुंबई विद्यापीठात प्रवेश घेतला आणि पनवेलच्या एएससी कॉलेजमधून (महात्मा फुले महाविद्यालय) २००० मध्ये मराठी सहित्यात पदवी घेतली. त्यानंतर २००३ मध्ये पत्रकारिता पदविका अभ्यासक्रम पूर्ण करून २००६ पासून आजपर्यंत पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत आहे.

**माझी करिअर भटकंती :** शिक्षण चालू असताना, तसेच पत्रकारितेत येण्यापूर्वी मी अनेक ठिकाणी नोकऱ्या केल्या. बारावी झाल्यानंतर मधली दोन वर्षे सुरुवातीला मेडिकल दुकानात नोकरी, इस्टेट एजंटच्या ऑफिसमध्ये ऑफिसबॉय, शाळेत शिपाई अशा प्रकारची कामे केली. बी.ए. झाल्यानंतर पत्रकारितेत येण्यापूर्वी पतपेढी, बांधकाम क्षेत्रात सुपरवायझर अशा विविध प्रकारच्या नोकऱ्या केल्या. पत्रकारितेत आल्यानंतर मी 'सकाळ', 'लोकमत', 'मुंबई तरुण भारत', 'रामप्रहर' यासारख्या वृत्तपत्रांत कामे केली.

**माझी लेखन सेवा :** शालेय जीवनातच हस्तलिखितात लेखनाला प्रारंभ केला. कॉलेज जीवनात कविता लिहीत गेलो. कॉलेजच्या वार्षिकांकात व स्थानिक वृत्तपत्रात काही कविता, लेख प्रसिद्धही झाले. वृत्तपत्रात काम करीत असताना दैनिक 'मुंबई तरुण भारत'मध्ये 'पारावरची वटवट', तसेच 'रामप्रहर'मध्ये 'सहज सुचलं' ही सदरे काही महिने चालवली. लवकरच कवितासंग्रह आणि कादंबरी प्रकाशनाच्या वाटेवर आहे.

**।।श्री स्वामी समर्थ।।**

